सकाळ महाब्रँड्स
MAHA BRANDS 2023 · BRANDS OF MAHARASHTRA

> ग्रामीण भागातील मनुष्यबळास सक्षम करायचे असेल तर त्यांना योग्य पद्धतीचे उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. मेडिकल किंवा इंजिनिअरिंगसारख्या क्षेत्रातील स्पर्धा, शिक्षण पूर्ण करण्यासाठी लागणारी आर्थिक ताकद आणि विषयांतील क्लिष्टता यांमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची परवड होते, हे ध्यानात आल्यावर त्यांच्यासाठी आयुष्यभर कार्यरत राहायचे, हे ध्येय आम्ही घेतले. 'आयआयबी'च्या २५ वर्षांच्या कारकिर्दीत विद्यार्थी आणि पालकांचे मिळालेले आशीर्वाद, हेच आमचे खरे संचित आहे.
>
> \- टीम आयआयबी



# 'आयआयबी'चे रौप्यमहोत्सवी वर्षात यशस्वी पदार्पण

## नांदेडला महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र बनविणारी संस्था

ISO 9001: 2015 Certified
IIB CAREER INSTITUTE PVT.LTD.

मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील मेडिकलच्या प्रवेशासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याच्या ध्येयाने प्रा. गणेश चौगुले यांनी **'आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट प्रा. लि.'** ही संस्था नांदेड येथे सुरू केली. गेल्या २५ वर्षांत प्रा. गणेश चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे २० हजार विद्यार्थी मेडिकल प्रवेशासाठी पात्र ठरले. २०१८ मध्ये प्रा. गणेश चौगुले सरांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली असून, सध्या 'टीम आयआयबी'ची धुरा मुख्य कार्यकारी संचालक श्री. दशरथ पाटील यांच्याकडे आहे. नांदेडमध्ये सुरू झालेल्या 'आयआयबी'चा आता मराठवाड्यासह पुणे, कोल्हापूर येथेही विस्तार झाला आहे. सर्व सोयीसुविधांनी सज्ज असलेल्या या संस्थेकडे विद्यार्थ्यांचा ओघ वाढत आहे. या संस्थेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा.


























### 'आयआयबी'ची वाटचाल

स्पर्धेत टिकायचे असेल, तर अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांकडून अचूक मार्गदर्शन व अपार कष्टांची गरज असते. इतके परिणामकारक मार्गदर्शन मिळण्याच्या गरजेतूनच कोचिंग क्लास ही समांतर शिक्षणप्रणाली उभी राहिली आहे. त्यापैकीच 'आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट प्रा. लि.' ही संस्था नावारूपाला आली आहे.

दैनंदिन अध्यापन, होमवर्क, टेस्ट सीरिजचा वापर करून ते विद्यार्थ्यांकडून करून घेणे, तो क्लासला नियमित आल्यापासून ते वेळेवर गृहपाठ, सराव परीक्षा या सर्व पद्धतीमुळे अंतिम परीक्षेत त्याला हमखास यश मिळते. मागील २५ वर्षांत 'आयआयबी'चे २० हजारांहून अधिक विद्यार्थी एमबीबीएसच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. त्यामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रात भवितव्य घडविण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांसाठी 'आयआयबी' ही एकमेव संजीवन संस्था ठरली आहे.

अडीच दशकांपूर्वी वैद्यकीय क्षेत्राच्या प्रवेशात मराठवाड्यातील विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी दिसत असे. त्यातही शहरी विद्यार्थ्यांचा वरचष्मा होता. तयारीसाठी विद्यार्थी हैदराबाद, राजस्थानातील कोटा किंवा मुंबई, पुणे येथे जात असत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही हे शक्य होत नव्हते. हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना येथेच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांची होणारी ससेहोलपट थांबावी, यासाठी प्रा. गणेश चौगुले यांनी १९९९ मध्ये नांदेड शहरात 'चौगुले कोचिंग क्लासेस'ची मुहूर्तमेढ रोवली. सन २००० च्या सुरुवातीला वैद्यकीय प्रवेशासाठी राज्यात एमएच-सीईटी (कॉमन एंट्रन्स टेस्ट) ही वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षा सुरू करण्यात आली. त्या वेळी नांदेड आणि लातूर या दोन्ही जिल्ह्यांतून मिळून केवळ ३० ते ४० विद्यार्थी एमबीबीएस प्रवेशासाठी पात्र ठरत होते. ते पाहून प्रा. गणेश चौगुले अस्वस्थ झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेत प्रा. गणेश चौगुले यांनी बायोलॉजीसारखा क्लिष्ट विषय सोप्या पद्धतीने आणि ग्रामीण भाषाशैलीत शिकविण्यास सुरुवात केली. विषयज्ञान सहज मिळू लागल्याने विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर यशस्वी होऊ लागले.

प्रा. गणेश चौगुले यांनी सुरू केलेल्या या चळवळीला आज 'आयआयबी'च्या रूपाने व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. मराठवाड्यातील नांदेड, लातूर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांपाठोपाठ पुणे, कोल्हापूर, अकोला या शहरांमध्ये 'आयआयबी'चा विस्तार झाला. सुरुवातीपासून असलेली प्रचंड मेहनत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक बांधिलकी, सर्वोच्च निकालाची परंपरा, उच्च गुण मिळवून देणारे परफेक्ट प्लॅनिंग आजही कायम आहे.






### 'नीट' आणि 'जेईई'ची परिपूर्ण तयारी

वर्षाच्या सुरुवातीपासूनच 'आयआयबी' विद्यार्थ्यांकडून 'नीट' परीक्षेची तयारी करून घेते. या परीक्षेत नेमके कसे प्रश्न विचारतात, सामान्यत: कोणते प्रश्न विचारतात, अपेक्षित प्रश्नांचा अंदाज यांच्या अनुषंगाने विषय शिकविला जातो. त्यामुळे कमीत कमी वेळात नेमका अभ्यास होतो. 'नीट' परीक्षेचे नियम, बारकावे, परीक्षा केंद्रांवरील वेळेचे नियोजन, हॉल तिकीट, ड्रेस कोड यांसारख्या लहानसहान गोष्टींचे नियोजन विद्यार्थ्यांकडून वर्षभर करून घेतले जाते. परीक्षा आणि अभ्यासक्रमात सातत्य टिकवून ठेवले जाते. इतकेच नव्हे, तर वर्दळीच्या ठिकाणच्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा देताना कोणती काळजी घ्यावी, यासाठी शहरातील वर्दळीचे ठिकाण निवडून त्या ठिकाणी विद्यार्थ्यांकडून नीट परीक्षेचा सराव करून घेण्यात येतो.

### 'नीट' २०२३ च्या निकालात 'आयआयबी'ला उत्तुंग यश

'आयआयबी'च्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणासाठी अनिवार्य असलेल्या 'नीट' २०२३ च्या परीक्षेत अलौकिक यश प्राप्त करीत भारतातील टॉप कॉलेज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एम्स (AIIMS), MAMC मध्ये पहिल्याच यादीत ६० हून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळवीत एक नवा ऐतिहासिक उच्चांक प्रस्थापित केला. गेल्या २५ वर्षांच्या वाटचालीत 'आयआयबी'तून मार्गदर्शन घेतलेले २० हजारांहून अधिक विद्यार्थी मेडिकल प्रवेशासाठी पात्र ठरले आणि 'डॉक्टर्स फॅक्टरी' हे बिरूद 'आयआयबी'ने खऱ्या अर्थाने सार्थ ठरविले.

'नीट' २०२३ च्या निकालात 'आयआयबी'च्या पलक जाजू, सायली महिंद्रकर व पलक शहा या विद्यार्थिनींनी ७२० गुणांपैकी ७०५ गुण प्राप्त करीत सर्वोत्तम स्थान प्राप्त केले आहे. तर शिवम माहुरे, ज्ञानेश्वर जाधव, साक्षी वजीरगावे, अर्जुन लिगंदळे या चार विद्यार्थ्यांनी ७२० पैकी ७०० गुण प्राप्त करीत यशाची मोहोर उमटविली आहे. त्यासोबतच भारती देशमुख व अनुष्का भारसवाडकर यांनी ७२० पैकी ६९६ गुण प्राप्त करीत घवघवीत यश मिळविले आहे.

यासोबतच 'आयआयबी'ने विषयवार गुणप्राप्तीमध्येही गगनभरारी घेतली असून, यात फिजिक्स विषयात १८० पैकी १८० गुण घेणारे एकूण सहा विद्यार्थी आहेत. यात पलक जाजू, सर्वेश हटकर, उझेर रुलानी, रामप्रसाद पाटील, सायली कदम, हाफीज सोहेल यांचा समावेश आहे. तर बायोलॉजी या विषयात ३६० पैकी ३६० गुण घेणारे एकूण पाच विद्यार्थी आहेत. यात पलक शहा, ज्ञानेश्वर जाधव, भारती देशमुख, अक्षय मिसाळ, शिवानी जाधव, गणराज नल्लावार यांचा समावेश आहे. तसेच केमिस्ट्री या विषयात १८० पैकी १८० गुण प्राप्त करणारे दोन विद्यार्थी आहेत. यामध्ये सायली महिंद्रकर व तेजस पोरे या दोघांचा समावेश आहे.

### अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज 'आयआयबी'

विद्यार्थ्यांना सहज आणि सोप्या पद्धतीने विषयाचे ज्ञान घेता यावे, यासाठी 'आयआयबी'ने अत्याधुनिक शैक्षणिक संकुलांची उभारणी केली आहे. क्लासच्या वर्गांमध्ये बसण्याची उत्तम व्यवस्था, शंकानिरसन गृह, स्वतंत्र प्रसाधनगृहे, भरपूर प्रकाश, फॅन्स, एसी, अभ्यासिका, सुसज्ज ग्रंथालय या व्यवस्था उपलब्ध आहेत. वर्गात शिरतानाच बायोमेट्रिक अ‍ॅटेंडन्स घेतला जातो. याशिवाय विषयासंदर्भातील आधुनिक सॉफ्टवेअर व कंटेन्टवेअर यांची उपलब्धता करून देण्यात आली आहे. यामुळे अभ्यासक्रमातील कठीण गोष्टी समजण्यास मदत होते. क्लासमध्ये फळा आणि स्क्रीन (पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन) यांचा वापर केला जातो. ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांमुळे जे शिकविले जाते त्यातील परिणामकारता वाढते. विद्यार्थ्यांसह पालकांनाही वेळोवेळी केल्या जाणाऱ्या वेब-आधारित सूचनांमुळे विद्यार्थी आणि पालक अतिशय समाधानी आहेत.

### 'आयआयबी'ची सामाजिक बांधिलकी

'आयआयबी' आणि 'लोकबिरादरी प्रकल्प' यांच्या संयुक्त विद्यमाने भामरागड येथे आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना 'नीट'साठी मोफत प्रशिक्षण दिले जाते. तसेच परभणी जिल्ह्यातील 'स्वप्नभूमी' येथील अनाथ विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन शिकवणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याशिवाय, 'आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट'कडून वीटभट्टी कामगारांच्या पाल्यांना गणवेश वाटप, क्लासेस परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता सीसीटीव्ही कॅमेरे, पोलिस चौकी, कोल्हापूरच्या पूरग्रस्तांना मदत, होतकरू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, गोंदिया-गडचिरोली येथील आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य आणि ऑनलाईन शिकवणी, इत्यादी सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात.

## आयआयबी - माजी विद्यार्थ्यांचे मनोगत



विद्यार्थ्याला यशाच्या शिखरावर पोहोचविण्यासाठी 'आयआयबी'ची नेहमी धडपड आणि तळमळ असते. त्यामुळेच विद्यार्थी हमखास यशस्वी होतो. तसेच आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे 'आयआयबी' प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देते. त्यामुळे राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यांतील पालक आपल्या पाल्यांना येथे पाठवितात.

**- डॉ. संदीप गोरे**
MBBS, MS (General Surgery), M.Ch. (Neurosurgery), Ex Asst Professor, Neurosurgery, Consultant Neurosurgeon



'आयआयबी'चे व्यवस्थापन उत्कृष्ट आहे. त्यांच्याकडे पेपरलेस वर्कवर विशेष भर दिला जातो. अभ्यासक्रमातील नोट्स अत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून पुरविल्या जातात.

**- डॉ. अभिजित कनजे**
MBBS, Md (Pulmonary Medicine) IDCCM (Critical Care Fellowship)



'आयआयबी'ची मुहूर्तमेढ प्रा. गणेश चौगुले सरांनी रोवली. ते अतिशय सहज आणि सोप्या पद्धतीने अवघड विषय शिकवीत होते. त्यामुळे विषयाबद्दलची मनातील भीती कायमची जाते. आजही त्याच पद्धतीने विषय शिकविला जातो, म्हणूनच भोवतालची परिस्थिती जाणण्याची क्षमता, स्वतःचा दृष्टिकोन, विचार तसेच इतरांपेक्षा वेगळेपण 'आयआयबी'मध्ये आहे.

**- डॉ. प्रमोल हंबर्डे**
MBBS, MS, M.Ch.Urology (Mumbai), Urologist & Andrologist



समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात सामावून घेण्यासाठी 'आयआयबी'च्या माध्यमातून शिष्यवृत्तीसारखे उपक्रम राबविले जातात. त्यामुळे गरजूंना चांगली मदत होते.

**- डॉ. लक्ष्मीकांत भोपळे**
MBBS, MS (General Surgery), M.Ch. (Neurosurgery), Ex Asst Professor Neurosurgery, Consultant Neurosurgeon



बदलत्या काळानुसार अपडेट राहणे गरजेचे असते. 'आयआयबी'नेदेखील सातत्याने बदल अंगीकारला असून, विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या युगात याचा फायदा होत आहे व सहज कुठल्याही परिस्थितीवर त्यांना या शिकवणीमुळे यशाच्या शिखराला गवसणी घालता येते. माझ्या मते 'आयआयबी'च्या यशाच्या मागे हेच गमक आहे

**- डॉ. विवेक शेटे**
MBBS, MS (General Surgery), M.Ch. (Neurosurgery)



कोणत्याही गोष्टीत सातत्य महत्त्वाचे असते. 'आयआयबी'मध्ये सातत्य टिकवून ठेवण्यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांकडून वेळेवर अभ्यास, चाचण्या, सराव या सर्व गोष्टी करून घेतल्या जातात.

**- डॉ. वैशाली देशमुख - कदम**
MBBS,MS.,OBGY (Fetal Medicine Fellowship)



आर्थिक परिस्थिती कमकुवत असताना इयत्ता बारावीला नांदेड येथे कोचिंग क्लासकरिता गेलो होतो. इच्छा असूनसुद्धा भावी आयुष्याचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता पुरेसा पैसा नसल्याने निराश होऊन माघारी परतण्याची वेळ आली होती. अशातच देवरूपी महान व्यक्तिमत्त्व माझ्या जीवनात आले आणि त्यांनी केवळ अल्पसे स्वप्नच नाही, तर मला अपेक्षेपेक्षा जास्त खूप काही दिले, असे ते माझे गुरुवर्य आदरणीय गणेश चौगुले सर. त्यांनी माझे भविष्य जोखून मला मोफत शिकविले, आर्थिक मदत केली. त्यांच्याच सहकार्याने मी MBBS चे शिक्षण पूर्ण करू शकलो. नंतरही त्यांचे मार्गदर्शन मिळत राहिले आणि मी MS (Orthopaedic) झालो. सध्या सर जे. जे. हॉस्पिटल, मुंबई येथे असिस्टंट प्रोफेसर पदावर कार्यरत आहे. चौगुले सरांचा माझ्या जीवनात फार मोलाचा वाटा आहे आणि तो मी कधीच विसरू शकणार नाही.

**- डॉ. संतोष दरूसिंग घोती**
MBBS, MS (Orthopaedic)

## विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी 'आयआयबी'ची पंचसूत्री

१. उत्कृष्ट अध्यापनकौशल्य
२. नियमित व भरपूर सराव परीक्षा
३. विद्यार्थिकेंद्रित शिक्षण प्रणाली
४. गुणवत्तेनुसार बॅचेसची रचना
५. उत्कृष्ट व्यवस्थापन

'आयआयबी'मध्ये विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्याकरिता प्रत्येक विषयाचे तज्ज्ञ त्या त्यासंदर्भात मार्गदर्शन करतात. ऑफलाइन व ऑनलाइन या दोन्ही पद्धतींनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले जाते. विद्यार्थ्यांचा प्रत्येक टप्प्यातील प्रगतीचा आलेख त्यांच्यासह पालकांपर्यंत पाठविण्यात येतो. आलेख घसरल्यास विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा एकत्रित समन्वय साधून पुढील टप्प्यात त्याची प्रगती कशी साधता येईल, यावर लक्ष केंद्रित केले जाते. आजपर्यंत जो निकाल आला आहे, त्याचे गमक ही पंचसूत्री आहे.

### 'आयआयबी' ची उज्ज्वल परंपरा

**महाराष्ट्रातून 'एमबीबीएस'साठी सर्वाधिक पात्र विद्यार्थी ठरलेली संस्था**

